# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड        जा.क्र. ३४४/२०१९        दिनांक   ०७/१०/२०१९**

## १) घरफोडी :-

**भाग्यनगर :-** दिनांक ०६.१०.२०१९ रोजी चे ०१.३० ते ०४.०० वा. चे दरम्यान, राजसारथीनगर तरोडा (बु) नांदेड येथे, यातील फिर्यादी हे त्यांचे मेव्हण्याला भेटण्यासाठी परीवारासह बाहेरगावी गेले असता कोणीतरी आज्ञात चोरटयांनी घराचे कडी कोंडा कुलूप तोडुन घराचे दार उघडुन आत प्रवेश करुन घरातील सोन्या चांदीचे दागीने, घडयाळ व रेनकोट असा एकुण १,३८,७६३/-रु चा ऐवज चोरुन नेला. वगैर **फिर्यादी गणपत लक्ष्मण शेवाळकर, वय ५१ वर्षे, व्यवसाय नौकरी रा. राजसारथी नगर, तरोडा (बु) नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं. ३१९/२०१९ कलम ४५७, ३८० भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/दळवे, मो.नं. ९९२३१३१११२** हे करीत आहे.

## २) अपघात :-

**अ)वजिराबाद :-** दिनांक ०५.१०.२०१९ रोजी चे ०८.०० वा.चे दरम्यान, बसस्थानक नांदेड येथे, यातील **मयत नामे धुरपतबाई विलास गंगाळे, वय ५० वर्षे, कल्याणनगर कॅनॉलरोड नांदेड** यातील बाई ही बसची साफसफाई करण्यासाठी जात असताना यातील नमुद बस चालकाने त्याचे ताब्यातील बस हि हयगयी व निष्काळजीपणे चालवुन मयताचे अंगावरुन घालुन तीचे डोक्यास गंभीर मार लागल्याने तीस उपचार कामी स. द. विष्णुपूरी येथे शरीक केले असता दिनांक ०५.१०.२०१९ रोजीचे १७.०० वा. मरण पावली. यातील आरोपी हा तीचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी किरण विलास गंगाळे, वय १६ वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. कल्याणनगर कॅनॉलरोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं ३२९/२०१९ कलम २७९, ३०४(अ), भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/आगलावे ,मो.नं. ९९२३७९९२०८** हे करीत आहेत.

**ब)विमानतळ :-** दिनांक ०५.१०.२०१९ रोजी चे १२.२० वा.चे सुमारास, न्यायभवन समोरील रोडवर नांदेड येथे, यातील **मयत नामे नागोराव दत्ता तेलंग, वय ४५ वर्षे, व्यवसाय ॲटोचालक रा. गोपाळचावडी ता. जि. नांदेड** हा आपला ॲटो क्रमांक एम.एच.-२६/बी.डी.-०३२९ ला यातील आरोपीने आपले ताब्यातील टिपर क्रमांक एम.एच.-२६/ए.डी.-१९१८ हयगय व निष्काळजीपणे चालवुन ॲटोला धडक देऊन ॲटोचालकाचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी विकास पि. नागोराव तेलंगे, वय २१ वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गोपालवाडी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं २५२/२०१९ कलम २७९, ३०४(अ), ३३७, भादंवि सह कलम १३४ मो.वा.का. कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/शिनगारे, मो.नं. ९५२७९५६१००** हे करीत आहेत.

## ३) घर जाळुन नुकसान केले :-

**किनवट :-**दिनांक ०३.१०.२०१९ रोजी चे १२.०० वा. चे सुमारास, सावरी ता. किनवट जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन पैसे देण्या घेण्याच्या कारणावरुन फिर्यादीचे राहाते घरावर रॉकेल टाकुन आग लावुन किंमती १,००,०००/-रु चे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी निवृत्ती मारोती शिवभक्त, वय ७० वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सावरी ता. किनवट ह. मु. दुर्गानगर आदिलाबाद (तेलंगना)** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे किनवट** गुरनं २३७/२०१९ कलम ४३६, ३४ भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/कांबळे, मो.क्रं. ९८२३०३१२२७** हे करीत आहेत.

## ४) विवाहितेचा छळ :-

**कंधार :-** लग्नाचे तिन वर्षानंतर सन २०१० ते आज पावेतो, मौ. गोणार जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने फिर्यादी बाईस तु मला पसंत नाहीस व तिस शिवीगाळ करुन मारहाण करुन घर बांधण्यासाठी एक लाख रुपये घेऊन ये म्हणुन शारिरीक व माणसीक छळ करुन घराबाहेर हकलुन दिले. वगैरे **फिर्यादी ३५ वर्षीय महीला** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे कंधार** गुरनं २६९/२०१९ कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/१९५९ व्यवहारे, मो.क्र. ९६०४३३३२५६** हे करीत आहेत.

## ५) बेकायदेशिर हत्यार बाळगणे :-

**विमानतळ :-** दिनांक ०५.१०.२०१९ राजी चे २१.४५ वा. चे सुमारास, हनुमानगड कमानीजवळ नांदेड येथे, यातीलन नमुद आरोपी तांनी संगणमत करुन बिना परवाना बेकायदेशिर रित्या लोखंडी खंजर बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/२१८२ तुकाराम विठ्ठलराव जायभाये, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे विमानतळ** गुरनं २५१/२०१९ ,कलम ४/२५, भाहका सह कलम ३४ भाविका कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१२२६ वाघमारे , मो.क्र. ८८८८०७६९३५** हे करीत आहेत.

## ६) विद्युत शॉक लागुन मृत्यु :-

**ईस्लापुर :-** दिनांक ०५.१०.२०१९ रोजी चे २१.४० वा. चे सुमारास, सरकारी दवाखाना ईस्लापुर ता. किनवट जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे ज्ञानेश्वर प्रकाश आदेवाड, वय १८ वर्षे, रा. कोल्हारी ता. किनवट जि. नांदेड**. हा देवीचे आरतीसाठी गेला असता अचानक इलेक्ट्रीक शॉक लागल्याने त्यास स. द. ईस्लापुर शरीक केले असता उपचार चालु असतांना मरण पावला. वगैरे **खबर देणार प्रकाश सदाशिव आदेवाड, वय ५५ वर्षे, रा. कोल्हारी ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **ईस्लापुर** आ.मृ. २४/२०१९ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास सपोउपनि/जाधव, मो.क्र. ९६८९४७५४१७** हे करीत आहेत**.**

## ७) प्रोव्हिबीशन :-

**१)मुक्रामाबाद :-** दिनांक ०६.१०.२०१९ रोजी चे ०७.०० वा. चे सुमारास, बारभाई तांडा ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी दारु किंमती १०००/-रु चा माल अवैध रित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१९७१ सुभाष भिमराव सुर्यवंशी, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरन १८४/२०१९ कलम ६५(ई), महाराष्ट्र प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/६४७ मरगेवाड , मो.क्र. ८६००७३३०२७** हे करीत आहेत.

**२)कुंटूर :-** दिनांक ०६.१०.२०१९ रोजी चे १८.३० वा. चे सुमारास, मौ. हिप्परगा ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु किंमती १४४०/-रु चा माल अवैध रित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/११८१ संतोष माधवराव कुमरे, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन १४६/२०१९ कलम ६५(ई), महाराष्ट्र प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/९४ बारी , मो.क्र. ९५११७३९७२५** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४